प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. आरटीई-२०१०/प्र.क्र.५७२/प्राशि-१, दि. १३.०२.२०१३.

२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र क्र. मराशैसंप्रप/अविवि/शैक्षणिक अर्हता / २०१८-१९/७३६, दि. ०४.०२.२०१९.

३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एचएचसी/१३८०/५६०११/(५६३६/८०३, उमाशि-१ दि. २५.०१.१९९०.

४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पत्र क्र.एचएससी-१८११/(२३४/२११)/उमाशि-१, दि.०९.११.२०१२.

<u>प्रस्तावना</u> :-

केंद्र शासनाने भारतीय राज्यघटनेत २००२ मध्ये दुरुस्ती करुन ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा मुलभूत अधिकार दिला आहे. त्या अनुषंगाने केंद्रशासनाने "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ पारित केला असून त्याची अंमलबजावणी दिनांक ०१ एप्रिल, २०१० राज्यात सुरु झाली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदरचा कायदा दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी वैध ठरविला आहे. या अधिनियमातील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११" अधिसूचित केले आहेत.

२. केद्र शासनाने दिनांक ३१ मार्च, २०१० च्या अधिसूचनेद्वारे शिक्षक पदावर नियुक्तीसाठी पात्रता व सेवा शर्ती ठरविण्याकरीता सदर कायद्याच्या कलम २३ नुसार "राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE)" यांना शैक्षणिक प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे.

३. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१० व दिनांक २९ जूलै, २०११ च्या अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षकांकरिता (इयत्ता १ ली ते ८ वी) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित केली असून शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibity Test- TET) अनिवार्य केली आहे.

४. त्यानुषंगाने राज्यातील प्राथमिक शिक्षकांकरीता (इयत्ता १ ली ते ८ वी) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दि. १३.०२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहे. प्राथमिक शिक्षक पदाकरीता (इयत्ता १ ली ते ८ वी) शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य असले तरी, इयत्ता ६ वी ते ८ वी करिता नियुक्त करावयाच्या शिक्षकांनी पेपर-२ या गटाची परीक्षा कोणता विषय घेऊन उत्तीर्ण व्हावे, याबाबत काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे विषयनिहाय शिक्षक इयत्ता ६ वी ते ८ वी करीता उपलब्ध करुन देणे आवश्यक असले तरी, शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्याकरीता अशी कोणतीही अट निर्धारित केलेली नसल्यामुळे, उमेदवार त्यांच्या पदवीच्या विषयाऐवजी अन्य शाखेचे विषय घेऊन, सदर परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शालेय स्तरावर अनिवार्य विषय निश्चित आहे. या विषयासाठी अध्यापन करणारे शिक्षक हे त्या त्या विषयांमध्ये पारंगत असणे आवश्यक आहे. मात्र उपरोक्त तरतुदींच्या आधारे आतापर्यंत ज्या विषयांचे अध्यापन करावयाचे आहे, त्या विषयाची पदवी नसली तरी शिक्षकांची नियुक्ती होऊन सदर शिक्षक हे स्वत:च्या पदवी व्यतिरिक्त अन्य विषयांचे अध्यापन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

५. शासन निर्णय दि. २५.०१.२०१६ नुसार आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील अभ्यासक्रमाची गुणवत्ता सुधारण्यासाठी स्थापन केलेल्या समन्वय समितीने दि.२९.०८.२०१८ रोजीच्या बैठकीत विविध विषयांच्या अभ्यासगट व समित्यामधील निवडक अध्यक्षांची निवड केली त्यानुसार संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे अध्यक्षतेखाली गठीत विषय योजना निश्चिती समितीने प्राथमिक/उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता विषयनिहाय निश्चित करुन दिली आहे. त्यानुषंगाने अशी अर्हता निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय :-</u>

संदर्भाधीन क्र. १, ३ व ४ येथील शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३, दिनांक २५.०१.१९९० आणि शासन पत्र दिनांक ०९.११.२०१२ अधिक्रमीत करण्यात येत असून, राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

### १.१) <u>इयत्ता १ ली ते ५ वी करिता (प्राथमिक शिक्षक):-</u>

अ) <u>शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता:-</u>

या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ठ “अ” नुसार प्राथमिक शिक्षंकाकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता अनिवार्य असेल.

आ) शिक्षक पात्रता परीक्षा **(TET)**

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासन किंवा महाराष्ट्र शासन आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibity Test- TET) उत्तीर्ण अनिवार्य असेल.

**१.२) इयत्ता ६ वी ते ८ वी करिता (उच्च प्राथमिक शिक्षक) :-**

अ) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता:-

सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट “ब” नुसार उच्च प्राथमिक शिक्षकांकरिता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता अनिवार्य असेल.

आ) शिक्षक पात्रता परीक्षा **(TET)**

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासन किंवा महाराष्ट्र शासन आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibity Test- TET) उत्तीर्ण अनिवार्य असेल.

**१.३) इयत्ता ९ वी ते १० वी करिता ( माध्यमिक शिक्षक ) :-**

अ) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता

या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट “क” नुसार माध्यमिक शिक्षकांकरीता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता अनिवार्य असेल.

**१.४) इयत्ता ११ वी ते १२ वी करिता ( उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक) :-**

अ) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता

या शासन निर्णयसोबत जोडलेल्या परिशिष्ट “ड” नुसार उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांकरिता शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता अनिवार्य असेल.

**२) प्रशिक्षण :-**

अ) ज्यांची शैक्षणिक अर्हता ५०% गुणांसह कला, विज्ञान, वाणिज्य शाखेची पदवी आणि D.Ed. अशी असेल किंवा किमान ४५% गुणांसह कला , विज्ञान , वाणिज्य शाखेची पदवी आणि एक वर्षाची शिक्षण शास्त्रातील (B.Ed) पदवी उत्तीर्ण केली असेल आणि ज्यांची नियुक्ती दिनांक ०१ जानेवारी, २०१२ पूर्वी इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत प्राथमिक शिक्षक पदावर झाली असेल त्यांना

नियुक्तीनंतर राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेद्वारे मान्यता प्राप्त ६ महिन्यांचा प्राथमिक शिक्षणातील विशेष प्रशिक्षण प्राप्त करणे आवश्यक आहे.

ब) ज्यांच्याकडे D.Ed. ( विशेष शिक्षण ) अथवा B.Ed.( विशेष शिक्षण) अर्हता, त्यांनी नियुक्ती नंतर प्राथमिक शिक्षणशास्त्रातील राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदाद्वारे मान्यता प्राप्त ६ महिन्यांचे प्राथमिक शिक्षणातील विशेष प्रशिक्षण प्राप्त करणे आवश्यक आहे.

**<u>३) पात्रता गुणांच्या टक्केवारीत सुट</u>** :- इयत्ता १ ली ते ८ वी च्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांच्या पदांकरीता अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती-ब/ भटक्या जमाती-क/ भटक्या जमाती-ड/ इतर मागास प्रवर्ग / विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग/ खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/ दिव्यांग उमेदवार इतर प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी पात्रता गुणांमध्ये ५% सुट देण्यात येईल.

४. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCET) नवी दिल्ली यांनी निश्चित केलेल्या आणि सुधारीत केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आणि आवश्यक तेथे शिक्षक पात्रता परीक्षा (TET) राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या, शासकीय, अनुदानित, अशंता: अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित आणि स्वयंअर्थ सहाय्यित शाळांमधील शिक्षक पदावर नियुक्ती करिता अनिवार्य असेल.

५. राज्य शासन किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या राज्य शैक्षणिक प्राधिकरण म्हणजे महाराष्ट्र राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT), पुणे यांना किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेमध्ये आवश्यक ती भर घालता येईल.

६. प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतांमध्ये करावयाच्या उपरोक्त सुधारणा ह्या महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मध्ये करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२०७१७२६५३४८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( स्वप्निल कापडणीस )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

४) मा. मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव.

५) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव.

६) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव.

७) मा. विधान परिषद/विधान सभा सदस्य (सर्व), विधान भवन, मुंबई.

८) मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.

९) अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई.

१०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, (सर्व) मंत्रालय, मुंबई.

११) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२) आयुक्त, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे.

१३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१५) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

१६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

१७) विभागीय आयुक्त (महसूल विभाग) सर्व

१८) सर्व जिल्हाधिकारी,

१९) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

२०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

२१) मुख्य अधिकारी, नगर पालिका/नगर परिषद (सर्व)

२२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

२३) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२४) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद.

२५) शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई

२५) निवड नस्ती (टीएनटी-१).

## परिशिष्ट “अ”

| अध्यापनाचे विषय | इयता १ ली ते ५ वी या वर्गांसाठी शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|
| **इयत्ता १ ली ते ५ वी या वर्गासाठीचे सर्व विषय** | मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो )<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणातील (B.El.Ed.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण आणि दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका (विशेष शिक्षण) परीक्षा उत्तीर्ण राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षांची पदविका (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण आणि ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड परीक्षा उत्तीर्ण<br><br>(**टिप :** जे उमेदवार बी.एड ही पात्रता पूर्ण करत असतील त्यांचा विचार नियुक्तीसंदर्भात इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून करण्यात येईल. तथापि, त्यांनी सहा महिन्यांचा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचा प्राथमिक शिक्षणशास्त्रातील अभ्यासक्रम Bridge course पूर्ण केलेला असणे बंधनकारक आहे). |

*********************************************************************************

## परिशिष्ट “ब”

| अ.क्र | विषय | इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक आर्हता |
|---|---|---|
| १ | इंग्रजी, मराठी , हिंदी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगु, गुजराती, तमिळ , मल्याळम,बंगाली, पंजाबी, संस्कृत | मान्यताप्राप्त विद्यापीठाची सबंधित विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br>उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |
| २ | पर्शियन | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्शियन भाषा विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किंवा अलिम (Aalim) किमान ५०% गुणांसह **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |

| | | |
|---|---|---|
| ३ | अरेबिक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची अरेबिक भाषा विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किंवा अलिम (Aalim) किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed./B.Sc.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |
| ४ | **गणित** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गणित/ संख्याशास्त्र विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed./B.Sc.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |

| | | |
|---|---|---|
| ५ | **विज्ञान** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र/ रसायनशास्त्र/ वनस्पतीशास्त्र/ प्राणीशास्त्र/ जीव विज्ञान (Life Sciences/पर्यावरणशास्त्र विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed./B.Sc.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |
| ६ | इतिहास , भूगोल , सामाजिक शास्त्र | मान्यताप्राप्त विद्यापीठाची इतिहास/ भूगोल/अर्थशास्त्र/ राज्यशास्त्र/ समाजशास्त्र विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed./B.Sc.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |

| | | |
|---|---|---|
| ७ | **गणित आणि विज्ञान** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गणित/ संख्याशास्त्र/ भौतिकशास्त्र / रसायनशास्त्र विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण **आणि** दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड ) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br><br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष )परीक्षा उत्तीर्ण **आणि** संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed./B.Sc.Ed (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |

*******************************************

शासन निर्णय शा.शि. व क्री. वि. क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१ दि. ०७ फेब्रुवारी, २०१९

परिशिष्ट "क"

| अ.क्र | विषय | इयत्ता ९ वी व १० वीच्या वर्गांसाठी शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|
| १ | **इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगु, गुजराती, तमिळ, मल्याळम, बंगाली , पंजाबी, संस्कृत , पाली , अर्धमागधी, जर्मन, फ्रेंच, रशियन, जपानी** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची सबंधित विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br><br>**किंवा**<br><br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण |
| २ | **पर्शियन** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्शियन विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किंवा आलिम (Aalim) किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण |
| ३ | **अरेबिक** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची अरेबिक विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किंवा आलिम (Aalim) किंवा फाजिल (Fazil) किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण |
| ४ | **गणित** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गणित/ संख्याशास्त्र विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br><br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed./Bsc.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण |
| ५ | **विज्ञान** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र/ रसायनशास्त्र/ वनस्पतीशास्त्र/ प्राणीशास्त्र/ |

| | | |
|---|---|---|
| | | जीव विज्ञान (Life Sciences)/पर्यावरणशास्त्र विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed./ Bsc.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह |
| ६ | **इतिहास** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची इतिहास / समाजशास्त्र/ राज्यशास्त्र/ विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह |
| ७ | **भूगोल** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची भूगोल विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed./ Bsc.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह |
| ८ | **गणित व विज्ञान** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गणित/ संख्याशास्त्र/ भौतिकशास्त्र/ रसायनशास्त्र विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed./ Bsc.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह |
| ९ | **सामाजिक शास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची इतिहास /भूगोल / समाजशास्त्र/ राज्यशास्त्र/ विषयातील पदवी किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षात संबंधित विषयासह किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची पदवी परीक्षा B.A.Ed./ Bsc.Ed. (किंवा समकक्ष) संबंधित विषयातून किमान ५० % गुणांसह |
| १०. | **शारीरिक शिक्षण** | शारीरिक शिक्षण या ऐच्छिक विषयासह पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | **किंवा**<br>शारीरिक शिक्षण या ऐच्छिक विषयासह पदवी परीक्षा किमान ४५ % गुणांसह उत्तीर्ण **आणि** भारतीय विद्यापीठे किंवा भारतीय ऑलिम्पिक संघटना यांचे मार्फत आयोजित क्रिडा / मैदानी खेळ क्रिडा स्पर्धांमध्ये राष्ट्रीय किंवा राज्य किंवा आंतरविद्यापीठ स्तरावर सहभाग प्रमाणपत्र<br>**किंवा**<br>पदवी परीक्षा किमान ४५ % गुणांसह उत्तीर्ण **आणि** भारतीय विद्यापीठे किंवा भारतीय ऑलिम्पिक संघटना यांचे मार्फत आयोजित क्रिडा / मैदानी खेळ क्रिडा स्पर्धांमध्ये राष्ट्रीय किंवा राज्य किंवा आंतरविद्यापीठ स्तरावर सहभाग प्रमाणपत्र<br>**किंवा**<br>सेवेत असलेल्या प्रतिनियुक्त उमेदवारांचे संदर्भात (प्रशिक्षित शारिरीक शिक्षण शिक्षक /प्रशिक्षक )<br>किमान ४५ % गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदने अधिसुचित केल्याप्रमाणे (मान्यता निकष आणि प्रक्रिया नियम व अटी २००९ नुसार ) किमान ३ वर्ष अध्यापनाचा अनुभव<br>**किंवा**<br>शारीरिक शिक्षण विषयातील पदवी परीक्षा किमान ४० % गुणांसह उत्तीर्ण<br>**किंवा**<br>शारीरिक शिक्षण या वैकल्पिक विषयासह पदवी परीक्षा किमान ४० % गुणांसह उत्तीर्ण<br>**किंवा**<br>शालेय , आंतर महाविद्यालयीन स्तरावर आयोजित क्रीडा/ मैदानी खेळांमध्ये सहभागी पदवीधर उमेदवार किंवा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद (मान्यता निकष व प्रक्रिया )नियम २००७. अधिसुचना १०.१२.२००७ नुसार NCC –C॰ प्रमाणपत्र प्राप्त उमेदवार<br>**किंवा**<br>३ वर्षांची शारीरिक शिक्षण विषयातील पदवी परीक्षा B.P.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br><br>**किंवा**<br>राज्य/ विद्यापीठीय स्तरावर क्रीडा / मैदानी खेळ स्पर्धांमध्ये सहभागी पदवीधर उमेदवार<br>**किंवा**<br>आंतर महाविद्यालयीन स्तरावर आयोजित क्रीडा/ मैदानी खेळांमध्ये प्रथम किंवा द्वितीय किंवा तृतीय स्थान प्राप्त आणि NCC –C॰ प्रमाणपत्र प्राप्त किंवा साहसी, धाडसी खेळ/क्रिडा प्रकारातील मूलभुत अभ्यासक्रम उत्तीर्ण पदवीधर उमेदवार<br>**किंवा**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद ,अधिसुचना १३.११.२००२ मध्ये अधिसुचित केल्याप्रमाणे (मान्यता प्रस्ताव , प्रस्ताव दाखल करणेची कालमर्यादा , अध्यापक शिक्षण कार्यक्रम/ अभ्यासक्रम सुरू करण्याची मान्यता व त्यासाठी पूर्ण करावयाचे |

| | | |
|---|---|---|
| | | नियम आणि निकष )नियम २००९ . नुसार क्रिडा विज्ञान , क्रिडा व्यवस्थापन , क्रिडा प्रशिक्षण , योगा, ऑलिम्पिक शिक्षण , क्रिडा पत्रकारीता इत्यादी मधील एक वर्षाचे प्रशिक्षण व पदवी<br>**आणि**<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून किमान १ वर्ष कालावधीची शारीरिक शिक्षण विषयातील पदवी (B.P.Ed.) किंवा समकक्ष उत्तीर्ण |

************************

**शासन निर्णय शा.शि. व क्री. वि. क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१ दि. ०७ फेब्रुवारी, २०१९**

**परिशिष्ट "ड"**

| अ.क्र | अध्यापनाचे विषय | इयत्ता ११ वी व १२ वी (उच्च माध्यमिक स्तरासाठी ) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|
| १ | **इंग्रजी , मराठी, हिंदी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगु, गुजराती, तमिळ , मल्याळम, बंगाली, पंजाबी, संस्कृत , पाली , अर्धमागधी , जर्मन , फ्रेंच रशियन, जपानी, स्पॅनिश, चिनी,** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची बी.ए.एड |

| | | |
|---|---|---|
| | | (B.A.Ed.) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| २ | **पर्शियन** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्शियन विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्शियन विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची बी.ए.एड (B.A.Ed.) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ३ | **अरेबिक** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची अरेबिक विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची अरेबिक विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची बी.ए.एड (B.A.Ed.) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ४ | **महाराष्ट्री प्राकृत** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची संस्कृत/ पाली/ अर्धमागधी विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची संस्कृत/ पाली/ अर्धमागधी विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची बी.ए.एड (B.A.Ed.) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ५ | **गणित** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गणित / संख्याशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची गणित / संख्याशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed./ Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| ६ | **इतिहास, भूगोल,राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, भूशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची इतिहास/ भूगोल/राज्यशास्त्र/ अर्थशास्त्र/ मानसशास्त्र/ भूशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची इतिहास/ भूगोल/राज्यशास्त्र/ अर्थशास्त्र/ मानसशास्त्र/ भूशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed./ Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ७ | **तर्कशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची तत्वज्ञान विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची तत्वज्ञान विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची बी.ए.एड (B.A.Ed.) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ८ | **वस्त्रशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वस्त्रशास्त्र /रसायनशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची वस्त्रशास्त्र/ रसायनशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed./ Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ९ | **शिक्षणशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed./ Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| १० | **भौतिकशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Physics/Electronics/Applied Physics/Nuclear Physics विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Physics/Electronics/Applied Physics/Nuclear Physics विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| ११ | **रसायनशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Chemistry (Organic/Inorganic/Physical/ Biochemistry/ Analytical) विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Chemistry (Organic/Inorganic/Physical/ Biochemistry/ Analytical) विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| १२ | **जीवशास्त्र** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Botany/ Zoology/ Environmental Science/ Life Sciences/ Bio Sciences/Microbiology/ Molecular Biology/ Plant Physiology/Biotechnology/Agriculture and Pest Management/ Genetics विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Botany/ Zoology/ Environmental Science/ Life Sciences/ Bio Sciences/Microbiology/ Molecular Biology/ Plant Physiology/Biotechnology/Agriculture and Pest Management/ Genetics विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| १३ | **पशुविज्ञान आणि तंत्रज्ञान**<br>Animal Science and Technology | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Veterinary Sciences/Biotechnology/Zoology/ Life Sciences विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | **किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Veterinary Sciences/Biotechnology/Zoology/ Life Sciences विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| १४ | **कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान**<br>Agricultural Science and Technology | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Agriculture Sciences/Biotechnology/Botany/ Life Sciences/ Microbiology विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Agriculture Sciences/ Biotechnology /Botany/ Life Sciences/ Microbiology विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| १५ | **अन्नशास्त्र व तंत्रज्ञान**<br>Food Science and Technology | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Food Science/ Food Processing/Food Technology विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Food Science/ Food Processing/Food Technology विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| १६ | **गृह व्यवस्थापन**<br>Home Management | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गृह विज्ञान (Home Science) विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची गृह विज्ञान (Home Science) विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed/ B.Sc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| १७ | **माहिती तंत्रज्ञान**<br>Information Technology | मान्यताप्राप्त विद्यापीठाची गृह विज्ञान (Home Science) विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची गृह विज्ञान (Home Science) विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची Bsc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| १८ | **पुस्तपालन व लेखाकर्म**<br>Book keeping and Accountancy | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br>**टीप : M.Com Applied / Business Economics असणारे उमेदवार पात्र नसतील.** |
| १९ | **वाणिज्य संघटन व व्यवस्थापन**<br>Organization of Commerce and management | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून B.Ed.परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br>**टीप : M.Com Applied / Business Economics असणारे उमेदवार पात्र नसतील.** |
| २० | **चिटणीसाची कार्यपद्धती**<br>Secretarial Practice | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | **किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br>**टीप : M.Com Applied / Business Economics असणारे उमेदवार पात्र नसतील.** |
| २१ | **सहकार**<br>Co-operation | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण **आणि** राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण<br>**टीप : M.Com Applied / Business Economics असणारे उमेदवार पात्र नसतील.** |
| २२ | Design and Colour | Graphic Designing सह GD Art / Architecture पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| २३ | History of Arts and Appreciation | Graphic Designing सह GD Art / Architecture पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| २४ | History of Development of Indian Music, Vocal Light Music, Vocal Classical music, Instrumental Music | मान्यताप्राप्त संस्था/ विद्यापीठाची संबंधित विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| २५ | Child Development<br>बाल विकास | मान्यताप्राप्त विद्यापीठाची Home Science/ Home Economics /Psychology/ Child Development विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | **किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची Home Science/ Home Economics /Psychology/ Child Development विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.A.Ed. /B.Sc.Ed. किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| **२६** | Health and physical Education<br>आरोग्य व शारीरिक शिक्षण | मान्यताप्राप्त विद्यापीठाची किमान ५० % गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून शारीरिक शिक्षण विषयातील पदव्युत्तर पदवी (M.P.Ed. ) परीक्षा उत्तीर्ण |
| **२७** | Environment Education<br>पर्यावरण शिक्षण | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्यावरणशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी.एड (B.Ed.)परीक्षा उत्तीर्ण<br>किंवा<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पर्यावरणशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह किंवा समकक्ष Credit Grade (CGPA*) सह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून ४ वर्षांची B.Sc.Ed किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |

Note: * CGPA – Cumulative Grade Point Average

************************************************************************************************